**शासकीय कर्मचा-यांची स्वीयेत्तर सेवेत बदली करण्यासंबंधातील प्रमाण अटी व शर्ती.**
**अट क्रमांक १३ वगळणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
निर्णय क्रमांक - स्वीयेसे १००१/५/सेवा २
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३१ जानेवारी २००१

**पहा - शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक - अरजा २४०१/७/सेवा ९, दिनांक १५ जानेवारी २००१.**

## निर्णय

वर नमूद केलेल्या शासन निर्णयाच्या परिणामी शासन आता असे आदेश देत आहे की, महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील परिशिष्ट -२ मध्ये शासकीय कर्मचा-यांची स्वीयेत्तर सेवेमध्ये बदली करण्यासंबंधातील विहित करण्यात आलेल्या प्रमाण अटी व शर्तीमधील **अट क्रमांक १३ दिनांक १ फेब्रुवारी २००१ पासून वगळण्यात येत आहे.**

२. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ ( सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार आणि त्यासंबंधीचे इतर सर्व अधिकार याचा वापर करुन शासन असाही आदेश देत आहे की, वरील निर्णय जिल्हा परिषद कर्मचा-यांनाही लागू राहतील.

३. **हे आदेश दिनांक १ फेब्रुवारी २००१ पासून अंमलात येतील.**

४. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) मधील यासंबंधीची तरतुद वगळण्याबाबतची सुधारणा स्वतंत्रपणे करण्यात येत आहे.

५. या आदेशाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानूसार व नावाने,

जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी.
27 MAR 2001

**वसन्त वा. चौधरी**
**शासनाचे उपसचिव.**

(G. (P) H2462 (15,000-1-02-01)